वाचले :-

१.मा.महापालिका सभा ठराव क्र. ५०२४ दि.१०/१०/२००३
२.आदेश क्र.लेखा/१अ/कावि/७१६/२०१४ दि.०१/१०/२०१४
३.केंद्रशासन वित्त विभाग कार्यालय ज्ञापन क्र NO.1/2/2015-E-II(B) दि.१०/०४/२०१५
४.मा.आयुक्त यांचेकडील दि. २०/०४/२०१५ चा मंजूर प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८, लेखा विभाग
क्र.लेखा/१अ/कावि/२६७/२०१५
दिनांक -२०/०४/२०१५

**विषय :- म.न.पा कर्मचा-यांना दि.०१ जानेवारी २०१५ पासून सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर करण्याबाबत**

**आदेश,**

केंद्रशासनाचे वित्त विभागाकडील ज्ञापन क्र. NO.1-2/2015-E-II(B) दि.१०/०४/२०१५ अन्वये केंद्रीय कर्मचाऱ्यांना दि.०१ जानेवारी २०१५ पासून १०७% वरुन ११३% प्रमाणे महागाई भत्ता वाढ मंजूर केलेली आहे. महापालिका कर्मचाऱ्यांना केंद्रीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता लागू करण्याचे धोरण असल्याने म.न.पा कर्मचाऱ्यांना दि.०१ जानेवारी २०१५ पासून महागाई भत्ता वाढ करणे आवश्यक आहे.

सबब, उपरोक्त क्र.१ ते ३ च्या अनुषंगाने म.न.पा. कर्मचाऱ्यांना केंद्रशासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे दि.०१ जानेवारी २०१५ पासून सहावा वेतन आयोगानुसार सुधारित वेतन संरचनेतील वेतन बँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतनावर अनुज्ञेय महागाई भत्ता दर १०७% वरुन ११३% प्रमाणे लागू करण्यात येत आहे. माहे एप्रिल १५ चे वेतन ११३% महागाई भत्ता विचारात घेऊन काढण्यात यावे तसेच माहे जानेवारी १५ ते मार्च १५ पर्यंत देय महागाई भत्त्याची थकबाकी माहे एप्रिल १५ चे वेतन देयका बरोबर काढण्यात यावी.

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

प्रति

सर्व संबंधित शाखाप्रमुख

प्रत

१. आयुक्त कक्ष
२.मा.अति.आयुक्त कक्ष
३.मा.मुख्यलेखापरिक्षक
४. सहा.आयुक्त प्रशासन
५. संगणक अधिकारी
६. मा.कामगार कल्याण अधिकारी

२/- वरील आदेशानुसार पगार बिलांमध्ये आवश्यक ते बदल करण्यात यावेत.

**मुख्यलेखापाल**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८